# प्रेस नोट दि. २७/०७/२०२३

## कामगारांना मारहाण करुन लुटणाऱ्या टोळीच्या गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवडने आवळल्या मुसक्या

दि. २३/०७/२०२३ रोजी सायंकाळी ०७:४५ वाजण्याचे सुमारास एक मजुर हा डांगे चौकातुन कामा वरुन पायी घरी जात असताना ताथवडे रोड, डांगे चौका जवळ ०२ बाईक वरुन आलेल्या अज्ञात इसमांनी एका इसमास अडवुन त्यास धमकावुन व मारहाण करुन तसेच चाकुने गंभीर दुखापत करुन त्याचे जवळील दहा हजार रुपये जबरदस्तीने हिसकावुन जबरी चोरी करुन तेथुन पळुन गेल्याने **वाकड पोलीस स्टेशन गु.र.नंबर-७१२/२०२३ भा.द.वि.कलम-३९४,३२३,५०४,३४ आर्म ॲक्ट ४(२५)** प्रमाणे गुन्हा नोंद होता. सदरचे प्रकार गंभीर स्वरुपाचे असल्याने **मा. पोलीस आयुक्त सो, विनयकुमार चौबे सो,** यांनी सदर बाबत गुन्हे शाखेने लक्ष घालुन आरोपी अटक करुन गुन्हा उघडकीस आणणे बाबत आदेशित केले होते.

त्यानुसार आम्ही **गुन्हे शाखा युनिट-४ कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर आवताडे व दरोडा विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, जितेंद्र कदम** यांना सदरचा गुन्हा हा गंभीर स्वरुपाचा असल्याने सदर घडलेल्या गुन्ह्या बाबत सयुक्तरित्या तपास करुन आरोपी निष्पन्न करुन आरोपींना तात्काळ अटक करण्याच्या सुचना दिल्या होत्या.

तेव्हा दाखल गुन्हयातील आरोपींताचा शोध घेणे कामी गुन्हे शाखा युनिट-४ चे सपोनि सिद्धनाथ बाबर, पोउपनि गणेश रायकर यांचे एक पथक व दरोडा विरोधी पथकाचे सपोनि अंबरिष देशमुख यांचे दुसरे पथक अशी दोन पथके तयार केले. त्यानंतर सदर पथकांनी मिळुन सदरचे आरोपी हे कोणत्या मार्गाने गुन्हा करण्यासाठी आले तो मार्ग व गुन्हा केल्या नंतर ते डांगे चौकतुन रावेतच्या दिशेने गेले त्या परिसरातील ६० ते ७० ठिकाणेचे सी.सी.टी.व्ही फुटेजची पाहणी केली. तेव्हा प्राप्त सी.सी.टी.व्ही मधुन सदरचा गुन्हा हा दोन मोटारसायकलवर आलेल्या एकुण ०६ आरोपींनी केल्याचे निष्पन्न झाले. तेव्हा तयार केलेल्या दोन्ही पथकांनी सी.सी.टी.व्ही फुटेज व्दारा व बातमीदारां मार्फत सहा आरोपींची नावे निष्पन्न केली.

त्यानंतर दि. २६/०७/२०२३ रोजी त्यातील पथकांनी आरोपी नामे **अजय शंकर शर्मा, वय-१९ वर्षे, रा-बिजली नगर, चिंचवड व ०३ वि.स.बालक** यांना बिजली नगर चिंचवड, भोंढवे वस्ती रावेत, भिमा कॉलनी रावेत अशा वेगवेगळया ठिकाणा वरुन शिताफीने ताब्यात घेवुन सदरचा गुन्हा उघडकिस आणला आहे.

तसेच सदर आरोपी व वि.स.बालकांकडे दाखल गुन्हयांचे अनुषंगाने तपास केला असता सदर आरोपींनी त्यांचे पाहिजे साथिदार नामे **सौरभ संतोष आरगळे, रा-रुपीनगर, निगडी व मुकेश गुप्ता, रा-बिजली नगर, चिंचवड** यांचेसह सदरचा गुन्हा केला असल्याचे निष्पन्न झाले आहे.

तसेच आरोपी व वि.सं.बालक यांना ताब्यात घेते वेळी त्यांचे कडे अशा प्रकारे चोरी केलेले परंतु गुन्हे दाखल नसलेले ०३ मोबाईल फोन मिळुन आले असुन एका इसमास धमकावुन व मारहाण करुन लुटल्याचे तपासात निष्पन्न झाले असुन अधिक तपास सुरु आहे.

सदर गुन्हयाचे तपासा दरम्यान पिंपरी चिंचवड महानगर पालिकेचे मॅट्रीक सेक्युरिटी ॲन्ड सव्हेलन्स प्रा.लि कंपनीचे सी.सी.टीव्ही फुटेजचा महत्वाचा उपयोग झाला आहे.

-----------------------------------------------------ooo----------------------------------------------------

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त मा. श्री. विनयकुमार चौबे सो, सह पोलीस आयुक्त मा. श्री. डॉ. संजय शिंदे, अपर पोलीस आयुक्त मा. श्री. वसंत परदेशी सो, पोलीस उप-आयुक्त, मुख्यालय/गुन्हे स्वप्ना गोरे मॅडम, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे मा. श्री. सतिष माने सो, मा. श्री. बाळासाहेब कोपनर यांचे मार्गदर्शनाखालील गुन्हे शाखा, युनिट-४, वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर आवताडे, दरोडा विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम, सपोनि अंबरिष देशमुख, तसेच गुन्हे शाखा युनिट-४ चे सपोनि सिद्धनाथ बाबर, पोउपनि गणेश रायकर, सहा.पो.उप.नि. दादा पवार, नारायण जाधव, संजय गवारे, अदिनाथ मिसाळ, आबासाहेब किरनाळे, पोहवा/ प्रविण दळे, रोहिदास आडे, तुषार शेटे, पोना/ वासुदेव मुंडे, सुनिल गुट्टे, सुरेश जायभाये, पोशि/ प्रशांत सैद, धनाजी शिंदे, गोंविद चव्हाण, सुखदेव गावंडे तसेच दरोडा विरोधी पथकाचे सपोउपनि महेश खांडे, पोहवा/ नितीन लोखंडे, पोना/गणेश हिंगे, आशिष बनकर, पोशि/ समिर रासकर, आबा कदम, गणेश सावंत, सुमित देवकर, कांबळे, पोशि/तांत्रिक विश्लेषण विभाग गुन्हे शाखा चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय तुंगार, स.पो.नि. सागर पानमंद, पोहवा/नागेश माळी, पोशि/पोपट हुलगे यांनी केली आहे.

**(स्वप्ना गोरे)**
पोलीस उप-आयुक्त, गुन्हे
पिंपरी चिंचवड